# प्रकरण क्र.4

# मॅन्युअल – 03

माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 मधील प्रकरण - दोन खंड (4)(1)(ख)(तीन)नुसार

**1. मालमत्तेचे करनिर्धारणः-**

1) विभाग निरीक्षक त्याच्या विभागातील सर्व मालमत्तांचे निरीक्षण करतो व या निरीक्षणात त्याला मालमत्तेसंदर्भात नवीन/अतिरिक्त/वाढीव बांधकाम, बदल, सुधारणा, मालमत्ता पाडून टाकणे, मालमत्तेच्या वापरातील अथवा भाडेतत्वावर देण्यातील बदल, मालमत्तेचे एकत्रीकरण यांसारखे काही बदल आढळल्यास, करपात्र/ **भांडवली** मूल्यातील सुधारणा, दुरुस्ती बदल, मालमत्ताधारकाचे नाव अंतर्भूत करणे/वगळणे, मालमत्ताकराच्या अधिदानासाठी प्राथमिकदृष्टया जबाबदार असलेली व्यक्ती या बाबींची खात्री करण्यासाठी संबंधित विभाग निरीक्षक सदर अहवाल विभाग अधीक्षकांना सादर करतो.

2) अधीक्षक, खात्याच्या सर्वेक्षकास मालमत्तेचे मोजमाप प्रत्यक्ष मोजमापाच्या आधारे किंवा मालमत्तेचे वास्तू शिल्पकार किंवा मालक यांनी नकाशात दिलेल्या जमिनीच्या मोजमापाच्या आधारे घेण्यास सांगतात. अधीक्षक मालमत्तेची पाहणी करतात व आवश्यकता भासल्यास करनिर्धारणाच्या फेर पुनरीक्षण खातरजमा करतात व त्यांचा 'विभागीय कोष्टकवार अहवाल' नामक प्रस्ताव विभागाच्या सहाय्यक करनिर्धारक व संकलकांना सादर करतात. पुनरीक्षण किंवा बदलाचा प्रस्ताव सादर करताना ते, अधिनियमाच्या कलम 154(1) मध्ये कल्पिलेले रास्त व वाजवी भाडे निश्चित करण्याकरिता कार्यालयाने ठरवून दिलेल्या दराचा आधार घेतात व वार्षिक भाडे/नुकसान भरपाई/अंदाजित भाडे यावर 10 टक्के वैधानिक वजावट देऊन करपात्रमूल्य निश्चित करतात.

3) विभागीय सहाय्यक करनिर्धारक व संकलक विभागीय कोष्टकवार अहवालाची छाननी करतात व दरात किंवा करपात्रमूल्यात आवश्यक तेथे दुरुस्ती/सुधारणा करतात.

4) विभागीय कोष्टकवार अहवाल त्यानंतर उप.करनिर्धारक व संकलक/करनिर्धारक व संकलक यांना मंजुरीसाठी सादर करण्यात येतात. मंजुरी देणारा अधिकारी उदा.उप.क.व सं. किंवा क.व सं., प्रत्येक प्रकरणात जो असेल तो, प्रस्ताव मंजूर करतो किंवा दर अथवा करपात्रमूल्य यांत, त्याला आवश्यकता वाटेल त्याप्रमाणे सुधारणा करतो.

विभागीय कोष्टकवार अहवालाच्या मंजुरीकरिता निश्चित केलेल्या करपात्रमूल्याच्या मर्यादाबाबत सुधारित परिपत्रक पुढील पानावर आहे-

फि-२७

# बृहन्मुंबई महानगरपालिका

कवसं/५४५८/MC/१९३७/प्र.अ.(सां)/१७-१८

05 FEB 2018

**विषय :** करपात्र मूल्याबाबतच्या तक्रारींची सुनावणी करण्याबाबतचे अधिकार.

**संदर्भ :** १)परिपत्रक क्र.कवसं/०६ अ/ प्र.अ.(सां)/१४-१५.
२) अति.आयुक्त (प्रकल्प)/४६७६ दि.२३.०१.२०१८.

संदर्भित परिपत्रक क्र.कवसं/०६ अ/ प्र.अ.(सां)/१४-१५ दि.२९.०४.२०१५ अन्वये करपात्र मूल्याविरोधातील तक्रारी निकाली काढण्याकरिता अन्वेषण अधिकारी यांचे निवासी/अनिवासी दोन्हींबाबत वादग्रस्त करपात्र मूल्यातील (R.V.) फरकाच्या रक्कमेनुसार विविधस्तर तयार करण्यात आले आहेत.

महानगरपालिका आयुक्त मंजूरी क्र.कवसं/नकप्र/६४४/१६-१७दि.३१.०३.२०१७ अन्वये अधिकाराचे प्रत्यायोजन अंतर्गत महानगरपालिका अधिनियम कलम १६५ अंतर्गत तक्रार निवारण करिता भांडवली मुल्यावर आधारित स्तर प्रस्तावित करण्यात आले असून रु.३ कोटी पेक्षा जास्त भांडवलीमूल्य असल्यास अति.आयुक्त (प्रकल्प) यांना अन्वेषण अधिकारी म्हणून प्रस्ताविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने करपात्र मूल्यावरील तक्रारींची सुनावणी करण्याकरिता उपरोक्त क्र.कवसं/०६ अ/प्र.अ.(सां)/ १४-१५ दि.२९.०४.२०१५ नुसार परिपत्रकात सुधारणा करुन खालील प्रमाणे प्रस्ताविण्यात येत आहे.

| अ.क्र. | अन्वेषण अधिका-यांचा हुद्दा | निवासी/अनिवासी दोन्हींबाबत वादग्रस्त करपात्रमूल्यातील (R.V.) फरक |
|---|---|---|
| १ | सहा. करनिर्धारक व संकलक | रु. १० लाख पर्यंत |
| २ | उप करनिर्धारक व संकलक | रु. १० लाखापेक्षा जास्त ते रु. ५० लाख पर्यंत |
| ३ | करनिर्धारक व संकलक | रु. ५० लाखापेक्षा जास्त ते रु. १ कोटी पर्यंत |
| ४ | उप आयुक्त (क व सं) | रु. १ कोटीपेक्षा जास्त ते रु. 2 कोटी पर्यंत |
| ५ | अति. आयुक्त (प्रकल्प) | रु. 2 कोटी पेक्षा जास्त |

D:\Jeet\General Crospondance\JEETU\AC 5458 MC 1937 Stats Karpatra Mulyababt takrar sunavani .docx

सदरहू तक्रारी संबंधित अन्वेषण अधिकारी यांनी निकाली काढल्यानंतर एकूण तक्रारींपैकी १०% तक्रारींची लेखा चाचणी व दक्षता अधिकारी (TAVO) यांच्याकडून पडताळणी करण्यात येईल.

यास्तव अति.आयुक्त (प्रकल्प) यांची उपरोक्त बाबींस मान्यता असल्यास पृष्ठ क्र.पृ-103 वरील परिपत्रक मान्यतेकरिता व स्वाक्षरी करिता सविनय सादर.

**श्री. अरविंद शं.चव्हाण**
**उप क व सं(मुख्यालय/शहर)(प्र)**

**श्री. प्रल्हाद श्री.कलकोटी**
**उप क व सं(संगणक)(प्र)**

**दे.शि. क्षीरसागर**
**करनिर्धारक व संकलक(प्र)तथा**
**उप आयुक्त**

डॉ. संजय मुखर्जी
**अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)**

महोदय,

D:\Jeet\General Crospondance\JEETU\AC 5458 MC 1937 Stats Karpatra Mulyababt takrar sunavani .docx

बृहन्मुंबई महानगर पालिका
अतिरिक्त आयुक्त (प्र.)
यांचे कार्यालय
05 FEB 2018
क्र.अति.आ./प्रकल्प 4678
28/02/2018

कवसं

Dy AC HQ

[illegible]/संगणक/मुख्यालय
[illegible] स्तरीय सहाय्यक/सहा. क.व.सं. ..................
[illegible] कर्मचारी अधिकारी/सहा.निवडणुक व नगरशुल्क अधिकारी
प्र.अ.- पदोन्नती/वेतनपत्रक/चौकशी..................
प्र.अ.- सांख्यिकी/सांख्यिकी जकात/शउ/दु.उपकर/संगणक/मा.अ.
पर्यवेक्षक रंगभूमीकर/शांबलो

करनिर्धारक व संकलक 1/3/18

करनिर्धारण व संकलन खाते (मुख्यालय)
AC/5952/HQ
01 MAR 2018
क्र. एसी..................
W.C..................
बृहन्मुंबई महानगरपालिका

कवसं./ 2121 /सांख्यिकी/२०१७-१८
दिनांक - 05/03/2018
मु. लि. व्यय, जकात, स. सा.

AO/Stat
For Urgent Complaince please
Dy A&C HQ 1/3/18

प्र.अ. (सां)
[illegible] 5/3/18

Kindly circulate to all AO Dy A&C Wards Copy to Rahul for scan

5)  विभागीय कोष्टवार अहवाल मंजूर झाल्यानंतर, विभाग कार्यालयात परिरक्षित केल्या जाणा-या करनिर्धारण पुस्तिकेतील सुधारणा अधिनियमाच्या कलम **162(2)** व **167** अन्वये दिल्या जाणा-या विशेष सूचनेत नमूद करुन सहा. क. व सं. त्या सूचना बजावण्यासाठी तयार करतात. या सूचना अधिनियमाच्या कलम **484** मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने तात्काळ बजावल्या जातात व त्यात असे नमूद केलेले असते की अधिनियमाच्या कलम **162** मध्ये आवश्यक असल्यानुसार मालमत्ताधारकाने ही सूचना मिळाल्यापासून **15** दिवसांच्या आत लेखी अर्जाद्वारे तक्रार केली पाहिजे व त्यात तक्रारीची कारणे विषद केली पाहिजेत.

6)  विशेष सूचनेच्या अनुषंगाने करपात्रमूल्याच्या विरोधात तक्रार प्राप्त झाल्यावर अधिनियमाच्या कलम **164** अन्वये मालक/तक्रारदार यांना तक्रारीच्या सुनावणीसाठी सूचनापत्र देण्यात येते व अधिनियमाच्या कलम **165** नुसार अन्वेषण अधिकारी या क्षमतेत सहा.क.व सं./उप.क.व सं./क.व सं. या तक्रारींची सुनावणी व अन्वेषण करतात. अन्वेषण अधिका-याने दिलेला निकाल तक्रारदारास समाधानकारक वाटला तर करपात्रमूल्य निश्चित करण्यासाठी अन्वेषण अधिका-यांनी दिलेला आदेश कायम होतो व तक्रारदार, अधिनियमाच्या कलम **217** नुसार तक्रार निवारणाच्या दिनांकापासून **15** दिवसांच्या विहित कालावधीत लघुवाद न्यायालयाच्या प्रमुख न्यायाधीशांकडे अन्वेषण अधिका-यांनी करपात्रमूल्य निश्चित करण्यासाठी दिलेल्या निकालाविरुध्द दावा दाखल करत नाही.

7)  सर्वसाधारण परिस्थितीत निरीक्षक त्याच्या विभागातील सर्व मालमत्तांचे निरीक्षण करतो व अधिनियमाच्या कलम **156** नुसार परिरक्षित केल्या जात असलेल्या करनिर्धारण पुस्तिकेत करनिर्धारणासंबंधी सर्व तपशील व नोंदी नोंदल्या जात आहेत याची खातरजमा करतो.

8)  अधिनियमाच्या कलम **156** च्या पोटकलम (अ)(ब)(क)(ड) अंतर्गत आवश्यक असलेल्या नोंदी कोणत्याही विभागाच्या करनिर्धारण पुस्तिकेत शक्य तितक्या पूर्ण केल्यानंतर अधिनियमाच्या कलम **160** नुसार करनिर्धारक व संकलक त्यासंबंधी राजपत्रात आणि स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संपूर्ण विभागात ठळक जागी भित्तीपत्रके चिकटवून जाहीर सूचना प्रसृत करतात व सर्व करनिर्धारण पुस्तिका करदात्यांना कलम **161 नुसार** निरीक्षणासाठी खुल्या ठेवतात. कलम **163** नुसार **भांडवली** मूल्याविरोधात तक्रारी मागविल्या जातात आणि त्यांची अधिनियमाच्या कलम **167** व **162(2)** मध्ये विहित केलेल्या पध्दतीनुसार सुनावणी होते व त्या निकालात काढल्या जातात.

9)  सर्व तक्रारींचा निपटारा झाल्यानंतर अधिनियमाच्या कलम **156** च्या पोटकलम (ई) नुसार आवश्यक असलेल्या नोंदी विभागाच्या करनिर्धारण पुस्तिकेत पूर्ण केल्या जातात. कलम **166** नुसार सहा.क.व सं./उप.क.व सं./क.व सं./सह आयुक्त यांनी पुढीलप्रमाणे प्रमाणपत्र देऊन हे पुस्तक प्रमाणित केले जाते. अधिनियमाच्या कलम **166(1)**च्या तरतुदींनुसार मी याद्वारे असे प्रमाणित करतो की या करनिर्धारण पुस्तिकेत नोंद घेतलेल्या करपात्रमूल्यात, लाल शाईने करण्यात आलेल्या सुधारणांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कायदेशीर हरकती घेण्यात आलेल्या नाहीत.

10)  महापालिका आयुक्तांनी दि.**01**एप्रिलपासून सुरु होणा-या आगामी वर्षासाठी अशा प्रकारे अधिप्रमाणित केलेल्या करनिर्धारण पुस्तिकेत एखाद्या व्यक्तीचे नाव घालावयाचे राहिले असल्यास अथवा पूर्वी वगळले गेले

असल्यास ते नाव घालणे, कोणत्याही मालमत्ता कराची जबाबदारी नसलेल्या व्यक्तीचे नाव वगळण्याची किंवा त्या आधारे कोणत्याही करपात्रमूल्याची रक्कम वाढविण्याची किंवा कमी करण्याची किंवा अधिनियमाच्या कलम **167** नुसार कोणत्याही मालमत्ताकराच्या दायित्वातून सूट देण्याची रद्द करण्याची नोंद करणे अथवा मालमत्ता कर लावण्याची नोंद करणे इत्यादी बदल करुन ती पुस्तिका सुधारित केली जाते.

**2. <u>मालमत्ताकराच्या वसुलीची कार्यपध्दती:-</u>**

1. बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888मधील कलम 197 नुसार मालमत्ता कर प्रत्येक 6 महिन्यासाठी वर्षातून दोनदा 1 एप्रिल व 1 ऑक्टोबर ला आगाऊ देय असतो. त्याप्रमाणे मालमत्ता कराची देयके कलम 486-अ प्रमाणे कराचे दायित्व असलेल्या व्यक्तीला वर्षातून एकदाच निर्गमित केली जातात.

2. कलम 202 नुसार मालमत्ता करांची देयके निर्गमीत केल्यापासून 3 महिन्यांच्या कालावधीनंतर मालमत्ता कराच्या थकीत रकमेवर आवर्ती दराने प्रतिमाह 2% प्रमाणे दंडाची तरतूद केली आहे.

3. मालमत्ता कराचा विहित कालावधीत भरणा केला नाही तर, कलम 203 नुसार थकबाकीदाराची स्थावर व जंगम मालमत्ता जप्ती अधिसूचना काढून ताब्यात घेण्याची तसेच सदर चीजवस्तू विकून मालमत्ता कराची रक्कम वसूल करण्याची तरतूद केलेली आहे.

4. सन 2002-03 ते 2010-11 या कालावधीच्या दंड रकमेबाबत तक्रारदारांकडून प्राप्त झालेल्या प्रकरणांचे बाबतीत आवर्ती दंड व थकीत मालमत्ता कराचे, तसेच दंडाचे परिगणन परिपत्रक क्र.22 दि.15.09.2009 अन्वये केले जाते.

5. वरीलप्रमाणे कारवाई करूनसुद्धा मालमत्ता कराचा भरणा केला गेला नाही, तर जप्त केलेल्या मालमत्तेचा जाहीर लिलाव करण्याविषयीची तरतूद कलम 203(1) आणि कलम 206 मध्ये केलेली आहे.

6. वर नमूद केलेल्या कलमांच्या आधारे, अटकावणी किंवा विक्री करण्याची कार्यवाही अंशत:/अयशस्वी झाल्यास अशा कसूरदाराकडून येणे असलेली रक्कम नगर दिवाणी न्यायालय / उच्च न्यायालयात दावा करून कसूरदाराकडून वसुल करण्याची तरतूद कलम 211 मध्ये केलेली आहे.

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**करनिर्धारण व संकलन विभाग**

परिपत्रक क्रमांक- एसी/ 22 83/ एनटीसी/ 335/16-17 दि. 04-08-2016

मालमत्ता कराची थकबाकी वसूल करण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 मधील कलम 202,203 व 206 मधील उपलब्ध तरतुदींच्या अधिन राहून जप्ती व अटकावणीची प्रक्रीया अधिक परिणामकारक करण्याच्या दृष्टीने सध्याच्या कार्यपध्दतीत करण्यात आलेल्या सुधारणा विभागीय उप क.व सं. / म. क.व सं. / अधीक्षक यांना खालील निर्देश देण्यात येत आहेत.

.....

थकबाकीदारावर कलम 206 अंतर्गत स्थावर मालमत्तेची जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यापूर्वी खालीलप्रमाणे कारवाई करावी.

(अ) एखाद्या परिवास्तुचे कर भरण्याचे प्राथमिक दायित्व असलेली व्यक्ती व भोगवटादार एकच असेल तर,

(1) थकबाकीदारास प्रथम मागणीची नोटीस पाठविणे.

(2) देयक विहित देय दिनांकाच्या आत न भरल्यास कलम 202 अन्वये दंड आकारणे.

(3) दंड आकारणीनंतर अथवा अनुक्रमांक 1 प्रमाणे मागणीची नोटीस दिल्यानंतरही थकबाकी वसूल न झाल्यास 21 दिवसानी संबंधित परिवास्तुची जलजोडणी खंडीत करणे.

(4) जल जोडणी खंडीत करुनही थकबाकीची दंडासह वसूली न झाल्यास जलजोडणी खंडीत दिनांकानंतर 21 दिवसानी इमारतीमधील भोगवटयात असलेल्या भागातील वापरात असलेल्या वस्तु जसे की, संगणक, यंत्रसामुग्री, फर्निचर वगैरे कलम 203 अन्वये जप्त करावे. सदर सर्व प्रकरणी कलम 205 अन्वये अनुसूची 'के' च्या नमुन्यात वस्तुसूची तयार करुन थकबाकीदारावर नोटीस बजाविणे. ( स्त्री धन व जीवनावश्यक वस्तु वगळून)

वरील (1) व (4) नुसार कारवाई होवून थकीत मालमत्ता कर संपूर्णतः वसुल होवू न शकल्यास पुढीलप्रमाणे कारवाई करावी.

(5) एक भोगवटादार असलेल्या इमारतीचा मालमत्ता कर थकित असल्यास सदर इमारतीचा वापर करण्यास प्रतिबंध करण्याकरीता त्या इमारतीचे प्रवेशद्वार मोहोरबंद करणे.

(6) जर इमारतीमध्ये एकापेक्षा अधिक भोगवटादार असल्यास इमारतीमधील गाळे जप्त करुन प्रवेश करण्यास प्रतिबंध करणे.

(7) जमिनीपोटी मालमत्ता कर थकीत असल्यास सदर जमिन अथवा बांधकामाखालील जमिनीवर प्रवेश करण्यासाठी व वाहनांची ये-जा करण्यासाठी असलेले प्रवेशद्वार मोहोरबंद करुन मालक वा त्यांचे कर्मचारी वा इतर कोणीही यांना परिवास्तुत प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येईल. तसेच जमिनीवरील बांधकाम सामुग्री जसे की , सामान वाहुन नेण्याची लिफ्ट , यंत्रसामुग्री इत्यादी मोहोरबंद करुन वापरास प्रतिबंध करण्यात येईल.

(ब) एखाद्या परिवास्तुचे कर भरण्याचे प्राथमिक दायित्व असलेली व्यक्ती व भोगवटादार एकच नसेल तर, भोगवटादारास कर भरण्यास जबाबदार ठरविण्याच्या दृष्टीने अंशतः थकबाकी असेलेल्या इमारतीच्या बाबतीत मालक अथवा सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून सदर थकबाकी कोणत्या भोगवटादाराची आहे हे प्रमाणित करण्याची

D:\A Joshi NTC\Attacment Policy 310516.docx

आवश्यकता राहील. सदरच्या थकबाकीदारावर आणि प्रमाणित झालेल्या थकबाकीच्या रकमेकरीता करवसुली खालीलप्रमाणे करण्यात येईल.

(1) थकबाकीदारास प्रथम मागणीची नोटीस पाठविणे.

(2) देयक विहित देय दिनांकाच्या आत न भरल्यास कलम 202 अन्वये दंड आकारणे.

(3) दंड आकारणीनंतर अथवा अनुक्रमांक 1 प्रमाणे मागणीची नोटीस दिल्यानंतरही थकबाकी वसूल न झाल्यास 21 दिवसानी संबंधित परिवास्तुची जलजोडणी खंडीत करणे.

(4) जल जोडणी खंडीत करुनही थकबाकीची दंडासह वसूली न झाल्यास जलजोडणी खंडीत दिनांकानंतर 21 दिवसानी इमारतीमधील भोगवटयात असलेल्या भागातील वापरात असलेल्या वस्तु जसे की, संगणक, यंत्रसामुग्री, फर्निचर वगैरे कलम 203 अन्वये जप्त करावे. सदर सर्व प्रकरणी कलम 205 अन्वये अनुसूची 'के' च्या नमुन्यात वस्तुसूची तयार करुन थकबाकीदारावर नोटीस बजाविणे. ( स्त्री धन व जीवनावश्यक वस्तु वगळून)

वरील (1) व (4) नुसार कारवाई होवून थकीत मालमत्ता कर संपूर्णतः वसुल होवू न शकल्यास पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

(5) एकच भोगवटादार असल्यास कलम 209 प्रमाणे थकीत रकमेची नोटीस बजावण्यात येईल व विहित कालावधीत कराचा भरणा न झाल्याने इमारतीचा मालमत्ता कर थकीत असल्यास सदर इमारत जप्त करुन मालक वा त्यांचे कर्मचारी वा इतर कोणीही यांना परिवास्तुत प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येईल.

(6) इमारतीमध्ये एकापेक्षा अधिक भोगवटादार असल्यास इमारतीमधील गाळे जप्त करुन प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येईल.

(7) एकापेक्षा जास्त भोगवटादार असल्यास कलम 209 प्रमाणे प्रत्येक भोगवटादारावर एकूण थकीत रक्कम प्रत्येक गाळयाच्या वार्षिक मालमत्ता कराच्या प्रमाणात विभागून नोटीस बजावण्यात येईल व विहित कालावधीत कराचा भरणा न झाल्यास वरील (1)ते(6) प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

वरीलप्रमाणे थकबाकीदार व थकबाकीची रक्कम प्रमाणित न केल्यास मालक अथवा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कार्यालयावर वरील ( (1) ते ( 6) प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

(8) जमिनीपोटी मालमत्ता कर थकीत असल्यास सदर जमिन अथवा बांधकामाखालील जमिनीवर प्रवेश करण्यासाठी व वाहनांची ये-जा करण्यासाठी असलेले प्रवेशद्वार मोहोरबंद करुन मालक वा त्यांचे कर्मचारी वा इतर कोणीही यांना परिवास्तुत प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येईल. तसेच जमिनीवरील बांधकाम सामुग्री जसे की , सामान वाहुन नेण्याची लिफ्ट , यंत्रसामुग्री इत्यादी मोहोरबंद करुन वापरास प्रतिबंध करण्यात येईल

(क) वरील (अ) अथवा (ब) नुसार कारवाई करुन एकविस दिवसाच्या आत जर थकीत रकमेचा भरणा करण्यात आला नाही तर कलम 206 नुसार स्थावर मालमत्तेबाबत जाहिर लिलावाद्वारे विक्रीची कारवाई करण्यात येईल.

(ख) लिलावाचा दिनांक निश्चित करुन सदर लिलावाबाबतची नोटीस थकबाकीदारांवर बजावण्यात येईल तसेच सदर नोटीस थकबाकी असलेल्या इमारतीवर अथवा तिच्या भागावर चिकटविण्यात येईल व

लिलावाच्या दिनांकापासून 15 दिवस आधी स्थानिय वर्तमानपत्रातून सदर लिलावाबाबतची जाहिर सूचना प्रकाशित करण्यात येईल.

(ग) थकबाकीदाराम लिलावाच्या निश्चित केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत थकीत मालमत्ता कर अदा करता येईल.

(घ) वरील (ग) नुसार लिलावापूर्वी थकीत मालमत्ता कर अदा झाल्यास लिलावाची प्रक्रीया रद्द करण्यात येईल.

(च) लिलाव प्रक्रीयेध्ये 3 पेक्षा कमी निविदाकार उपलब्ध झाल्यास अथवा महापालिकेतर्फे ठरविण्यात आलेल्या राखीव किंमतीपेक्षा कमी किंमतीची बोली करण्यात आल्यास सदर मालमत्ता महानगरपालिकेच्यावतीने नाममात्र किंमतीने विकत घेण्यात येईल.

(छ) लिलाव प्रक्रीयेमध्ये संबंधित विभागाच्या सहाय्यक करनिर्धारक व संकलक यांनी पुकारलेल्या लिलावात यशस्वी बोली बोलणा-या व्यक्तीला अथवा महानगरपालिका आयुक्त यांस सदर मालमत्ते संदर्भात यथायोग्य विक्री प्रमाणपत्र देण्यात येईल.

(ज) सदर लिलाव प्रक्रीयेत महापालिकेच्यावतीने मालमत्ता खरेदी करण्यात आली असल्यास नगर भू-अभिलेख कार्यालयात तसेच मिळकत पत्रकावर सदर मालमत्तेचे मालक म्हणून नोंद घेण्याची प्रक्रीया संबंधित विभागाच्या सहाय्यक करनिर्धारक व संकलक यांचेमार्फत करण्यात येईल.

(झ) उपरोल्लेखित परिच्छेद 'अ' व 'ब' मधील कार्यवाही करण्यापूर्वी मालमत्ताधारक / भोगवटादार इत्यादीकडून मालमत्ता कराच्या वसूलीसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

1. स.क.व.सं. यांनी विभागीय उप क.व सं. यांजकडे थकबाकीदारांच्या नावासह थकबाकीचा साद्यंत तपशील प्रतिमाह यादीद्वारे सादर करावा. उप करनिर्धारक व संकलक यांनी सदरची सर्व माहिती उप आयुक्त ( कवसं) यांना प्रत्येक महिन्याच्या 5 तारखेपूर्वी सादर करावी.
2. उप क. व सं. यांनी प्रत्येक मालमत्तेचे संपूर्ण तपशील पडताळून अटकावणी /जप्तीचे प्रस्ताव निम्नलिखित दर्शविलेल्या थकबाकीच्या विगतवारीनुसार मान्यतेसाठी विनाविलंब सादर होतील याची दक्षता घ्यावी.

<u>तक्ता - 1</u>

| अनुक्रमांक | मालमत्तेचे भांडवली मूल्य(रुपये) | अटकावणी प्रकरणाशी संबंधीत थकबाकी (रुपये) | मंजुरीसाठी सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | रु.25 कोटी पर्यंत | रु.1 कोटी पर्यंत | उप करनिर्धारक व संकलक |
| 2 | रु.25 कोटी ते रु.50 कोटी पर्यंत | रु.1 कोटी ते रु.5 कोटीपर्यंत | करनिर्धारक व संकलक |
| 3 | रु 50 कोटी ते रु 100 कोटीपर्यंत | रु.5 कोटी ते रु 30 कोटीपर्यंत | उप आयुक्त ( कवसं ) |
| 4 | रु 100 कोटीपेक्षा जास्त | रु.30 कोटीपेक्षा अधिक | अति.आयुक्त (प्रकल्प) |

D:\A Joshi NTC\Attacment Policy 310516.docx

वरील 'अ' अथवा 'ब' प्रमाणे कारवाई करुन देखील मालमत्ता करा अदा न झाल्यास लिलाव प्रक्रीया सुरु करण्यापूर्वी निम्नलिखित दर्शविलेल्या थकबाकी अथवा मालमत्तेचे भांडवली मूल्याच्या विगतवारीनुसार मान्यता घेण्यात यावी.

तक्ता - 2

| अनु क्रमांक | मालमत्तेचे भांडवली मूल्य(रुपये) | अटकावणी प्रकरणाशी संबंधीत थकबाकी (रुपये) | मंजुरीसाठी सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | रु.25 कोटी पर्यंत | रु.1 कोटी पर्यंत | उप करनिर्धारक व संकलक |
| 2 | रु.25 कोटी ते रु.50 कोटी पर्यंत | रु.1 कोटी ते रु.5 कोटीपर्यंत | करनिर्धारक व संकलक |
| 3 | रु 50 कोटी ते रु 100 कोटीपर्यंत | रु.5 कोटी ते रु 30 कोटीपर्यंत | उप आयुक्त ( कवसं ) |
| 4 | रु 100 कोटी ते रु 300 कोटीपर्यंत | रु.30 कोटी ते रु.50 कोटीपर्यंत | अति.आयुक्त (प्रकल्प) |
| 5 | रु 300 कोटीपेक्षा जास्त | रु 50 कोटीपेक्षा जास्त | महापालिका आयुक्त |

3. उपरोक्त सक्षम प्राधिकारी यांची मान्यता असल्याखेरीज मालमत्तांची जप्ती करणे अथवा जप्तीची कार्यवाही रद्द करण्याची कार्यवाही करु नये. स्तंभ क्र.2 व 3 मधील निकषांनुसार अटकावणी / जप्तीची प्रकरणे ही ज्या वरिष्ठ पातळीवर सादर करणे आवश्यक आहे त्या प्राधिका-याकडे मान्यतेसाठी सादर करावीत. प्रस्तुत प्रकरणातील स्तंभ 2 व 3 मधील मूल्य हे मालमत्ता क्रमांकनिहाय राहतील.

4. अटकावणी वॉरंट बजाविल्यानंतर पक्षकारास थकबाकीचे अधिदान करुन मालमत्ता अटकावणीमुक्त करावयाची असल्यासः-

   अ) मालमत्ताधारकास एकूण थकीत रक्कमेपैकी 50 टक्के रक्कम रोख /डी.डी. द्वारे अधिदानित करण्यासाठी स.क.व सं. यांनी कळवावे.

   ब) वरील थकीत रक्कम 25टक्के + 25 टक्के या प्रमाणे चालू देयक कालावधीतील देय दिनांकापर्यंत रोख / डी.डी. द्वारे भरण्यासाठी दोन हप्त्यांची सवलत स.क.वसं. यांनी द्यावी.

   क) वरील दोन्हीबाबत कालखंड किंवा रक्कम यापैकी कोणतीही अट शिथिल करण्याबाबत पक्षकाराने विनंती केली तर प्रकरण मान्यतेसाठी वरील तक्ता- 1 नुसार सक्षम प्राधिका-याकडे सादर करावे.

5. करवसूलीकरिता जलजोडणी खंडीत व पुनर्स्थापित करण्यासाठीही उपरोक्त कोष्टकानुसार प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यास सादर करावा.

6. सदरची प्रकरणे संबंधित सहाय्यक करनिर्धारक व संकलक यांनी हातोहात सक्षम अधिकारी यांच्या मंजुरीसाठी सादर करावीत. टपालाद्वारे सदरची प्रकरणे पाठवू नयेत.

15/7/16 15-7-2016

क.व सं. (प्र) | उप आयुक्त ( कवसं ) | अति.आयुक्त (प्रकल्प)

D:\A Joshi NTC\Attacment Policy 310516.docx

मा. म.न.पा. आयुक्त

डी-1

# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्रमांक कवसं/- 9976/ ~~एमसी~~ जन /१८-१९

10 JAN 2019

विषय :- थकबाकीदारांच्या मालमत्तांची जलजोडणी खंडीत करणे व मालमत्ता सील करण्याबाबत कायदेशीर मत.

संदर्भ:- 1) परिपत्रक क्र.एसी/2283/एनटीसी/ 335/ दि.04/08/2016 . (पृ 33 ते 36)

2) अति. आयुक्त (प्रकल्प) यांचे आदेश क्र.AMC/P/2980 दि.11.10.2018. (पृ-4)

3) क्र.LCT / 4600 /MC / दिनांक २८.१२.२०१८ (पृ ५ ते ७)

करनिर्धारण व संकलन खात्याने दिनांक 04.08.2016 रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार मालमत्ता कराच्या थकबाकीच्या वसूलीसाठी थकबाकीदारांच्या संबंधित मालमत्ता मोहोरबंद (Seal) करण्याची कारवाई करण्यात येत असे. वरील परिपत्रकाच्या आधारे मेसर्स. ऑरबिट कॉर्पोरेशन यांची मालमत्ता थकबाकीच्या वसूलीसाठी करनिर्धारण व संकलन खात्याने मोहोरबंद केली असता त्यास सदर कंपनीने उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.1592/2016 अन्वये आव्हान दिले. यावर उच्च न्यायालयाने दि. 01/09/2016 रोजी निर्णय दिला असून त्यानुसार मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या उपलब्ध तरतुदींनूसार मालमत्ता कराच्या वसूलीसाठी मालमत्ता मोहोरबंद करणे हे महानगरपालिकेच्या अधिकार कक्षेच्या बाहेर असून मालमत्तेचे सील उघडण्याचे आदेश महानगरपालिकेस दिले.

वरील निर्णयामुळे मालमत्ता कराच्या थकबाकीच्या वसूलीसाठी वरील परिपत्रकात नमूद केलेली जलजोडणी खंडीत करण्याची व मालमत्ता मोहोरबंद करण्याची कारवाई उचित नसल्याचा व
पृ १ ते ३ सदर परिपत्रक रद्दबातल करण्याचा प्रस्ताव तत्कालीन अति. आयुक्त प्रकल्प यांस सादर करण्यात
पृ-3 ते 4 आला. त्यावर प्रस्तुत प्रकरणी कलम 203 मधील जप्ती / अटकावणी /विक्री बाबत अधिनियमात उपलब्ध असलेल्या तरतूदी या मालमत्ता प्रत्यक्ष ताब्यात घेतल्याखेरीज अंमलात आणणे शक्य नाही या संदर्भात कायदा अधिकारी यांचे मत घ्यावे असे आदेश प्राप्त झाले. त्याचप्रमाणे, मालमत्तेची विक्री करण्याकरिता मालमत्ता सील केल्याखेरीज कारवाई करणे शक्य आहे काय याबाबतचे अभिप्राय परिपत्रकाच्या कायदेशीर परिणामांच्या अनुषंगाने कायदा खात्याने द्यावेत असे आदेश देण्यात आले.

वरील आदेशांनुसार कायदा खात्यामार्फत विशेष विधिज्ञ ॲड. श्री. पाकळे यांचे कायदेशीर
पृ ५ ते ७ मत क्र. LCT/4600/MC नुसार दि. 28.12.2018 रोजी या कार्यालयास प्राप्त झाले आहे. या मतानुसार:-

1. वास्तविक, उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात वरीष्ठ न्यायालयात अपील दाखल करून त्यास आव्हान देणे या प्रकरणात गरजेचे होते. तसे न केल्यामुळे जोपर्यंत उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय वरिष्ठ न्यायालय बाजूस सारत नाही तोपर्यंत उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे अनुपालन करणे महानगरपालिकेस बंधनकारक आहे. त्यामुळे संदर्भित परिपत्रकानुसार ज्या मालमत्ता मोहोरबंद केलेल्या आहेत त्या मुक्त करणे अत्यावश्यक आहे.

2. मुंबई महानगरपालिका अधिनियमातील कलम 140 अन्वये महानगरपालिकेने आकारावयाच्या मालमत्ता करामध्ये जलकर, मलनिसा:रण कर, अतिरिक्त जलकर आणि अतिरिक्त मलनिसा:रण कर यांचा समावेश आहे.

3. तसेच कलम 279 (1) अन्वये जलकराच्या संदर्भात (Water Tax) रक्कम थकित असल्यास महानगरपालिका आयुक्तांस खासगी जलजोडण्या खंडीत करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. वरील अ.क्र. 2 आणि 3 बाबत एकत्रित विचार करता आयुक्त महोदयांच्या मान्यतेने निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार मालमत्ता कराची वसूली प्रभावीपणे करण्यासाठी संबंधित मालमत्तांची जलजोडणी खंडीत करणे शक्य आहे.

दरम्यान, महानगरपालिकेतर्फे सर्वोच्च न्यायालयात प्रस्तुत प्रकरणी स्पेशल लीव्ह पिटीशन दाखल करण्यात येत आहे.

उपरोल्लेखित कायदेशीर मताच्या आधारे तसेच कलम 279 मधील तरतुदीच्या अधीन राहून याद्वारे असे प्रस्ताविण्यात येत आहे की,

अ) वरील अ.क्र. 1 नुसार , परिपत्रक क्र.एसी/2283/एनटीसी/ 335/दि.04.08.2016 मध्ये नमूद केलेल्या मालमत्ता मोहोरबंद करण्याच्या कारवाईस स्थगिती देण्यात यावी तसेच उक्त परिपत्रकानुसार यापूर्वी मोहोरबंद (सील) केलेल्या मालमत्ता सीलमुक्त कराव्यात. 'अ'

ब) वरील अ.क्र. 2 व 3 नुसार , कलम 279 मधील तरतुदीच्या आधारे उपरोक्त परिपत्रकात नमूद केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे मालमत्ता कर थकीत राहिल्यास संबंधित मालमत्तेची जलजोडणी महसूलाच्या वसूलीसाठी खंडीत करण्याबाबतची परिपत्रक क्र.एसी/2283/एनटीसी/ 335/ दि.04.08.2016 मधील कारवाई चालू ठेवण्यात यावी. 'ब'

कृपया उपरोक्त अ) आणि ब) मान्यतेसाठी सविनय सादर.

| सुधाकर ताडगे | चंद्रकांत के. कूड | देविदास शि.क्षीरसागर |
|---|---|---|
| उप क.व सं.(शहर)(प्र) | उप क.व सं.(मुख्यालय) | करनिर्धारक व संकलक (प्र.) |

विजय बालमवार
**उप आयुक्त (निवडणूक)**
महोदय,

① वरील 'अ' नूसार जरी कार्यवाही सुरू नसेल तरीही सदरहू परिपत्रक रद्द करण्याचे योग्य कारण व मा. अति आयुक्त (प्रकल्प) टी-६६ यांचे आदेश/शेरा नूसार पुन्हा प्रकरण त्यांना सादर झालेले दिसत नाही.
② वरील 'ब' मान्य करण्यास हरकत नसावी
15.2.19
उप आयुक्त (निवडणूक)

श्री प्रविण दराडे
**अतिरिक्त आयुक्त**
( प्रकल्प )
महोदया,

02/3/2019
अति. आयुक्त (प्र)

अजोय मेहता
**महानगरपालिका आयुक्त**
महोदय,

'अ' approved as proposed.
'ब' continue as per current practice.
13/3/19
Addl. Municipal Commissioner

MGC/F/8660
13/3/19

उप आयुक्त (निवडणूक) यांचे कार्यालय
दि. 11/01/19
क्र. उप आयुक्त/निवडणूक/ 1586

02/02/19

Nin 98

आदेशान्वये

- सदरबाबत उप आयुक्त (निवडणूक) यांनी आपणासोबत चर्चा करण्याचे आदेश दिले आहेत.
- उप आयुक्त (निवडणूक) यांचे कार्यालयाकडून चर्चेसाठी वेळ व दिनांक घेणेस विनंती.

2.2.19

उप आयुक्त (क.व.सं.) यांचे
प्रशासकीय अधिकारी

उपकवर्स (मुख्यालय)

करनिर्धारण व संकलन खाते (मुख्य कार्यालय)
AC/3923/19
- 4 FEB 2019
क्र. एसी.......
W.C.......
बृहन्मुंबई महानगरपालिका

नस्ती

उप.क.व.स/शहर/पु.उप./प.उप./जकात/संगणक/मुख्यालय
करनिर्धारक व संकलक यांचे स्वीय सहाय्यक/सहा. क.व.सं. ..........
गटप्रमुख कर्मचारी अधिकारी/सहा.निवडणुक व नगरशुल्क अधिकारी
प.अ.- पदोन्नती/वेतनपत्रक/चौकशी..........
प.अ.- सांख्यिकी/सांख्यिकी जकात/शहर/दु.उपकर/संगणक/मा.अ
पर्यवेक्षक रंगभूमीकर/शांतलो

उपकरनिर्धारक व संकलक मुख्यालय

बृहन्मुंबई महानगर पालिका
अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)
यांचे कार्यालय
02 MAR 2019
क्र. अति. आ./प्रकल्प/ 5201

05/03/2019

बृहन्मुंबई महानगरपालिका
आयुक्तांचे कार्यालय

07 MAR 2019

समव ११, १२, १३, १४
१५, १६, १७, १८

क्रमांक MGC/F/8660

(Note)

करनिर्धारण व संकलन खाते (मुख्यालय)
AC/4455/MC
14 MAR 2019
क. सी.
W.C.
बृहन्मुंबई महानगरपालिका

उप.क.व.सं/शहर/पु.उप./प.उप./जकात/संगणक/मुख्यालय
करनि यांचे स्वीय सहाय्यक/वस. व.प.सं. ..................
महाप्रमुख कर्मचारी अधिकारी/वस.निवडणुक व करसंकलक अधिकारी
प.अ.- पदोन्नती/वेतनपत्रक/चौकशी..................
प.अ.- सांख्यिकी/गांखिकी जकात/शहर/पु.उपनगर/संगणक/मा.अ
पर्यवेक्षक रंगभूमीकार/शांवलो

उपकरनिर्धारक व संकलक (मुख्यालय)

A O (Stats)

This as ~~Hon A.C.~~

Hon A A C, Sir

(A) If approved, this will be circulated to all wards with instructions to follow Hon M.C. Sir's orders.

16/3/19
Dy AAC(C)(I/C)

कवसं/1675/सांख्यिकी/2018-19
दिनांक 25/3/19

Dy AC (City)

'A' agreed

18/3/19

pl. circulate & then keep with original 2283 file.

प्र.अ.(सां.)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**परीपत्रक क्र.एसी/22/जनरल/2009-10**

**दिनांक 15.09.2009**

विषय: वार्षिक तत्वावर आकारलेल्या दंडाची वसुली आणि दंडशुल्काची माफी.

संदर्भ: 1) सह आयुक्त (सुधार) यांची दि.09.02.2009ची क्र.सह आयुक्त/सुधार/1319/कवसं मंजुरी.
2) अति.आयुक्त (प्रकल्प) यांची दि.21.08.2009 क्र.अति.आयुक्त(प्रकल्प)/4332/कवसंची मंजुरी.

मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888च्या कलम 207 ए(1) मधील सुधारणेनंतर दिनांक 25.10.2002च्या परिपत्रक क्रमांक एसी/33/जनरल अन्वये दिनांक 01.04.2002 पासून मालमत्ताकर देयकांच्या थकबाकीवर प्रति वार्षिक 20% दराने दंड आकारणी केली जाते.

विधि खात्याकडे 'प्रति वार्षिक' या संज्ञेच्या 'अर्थाची उकल' विचारली असता त्यांनी वरिष्ठ समुपदेशी सल्लागार श्री.के.के.सिंघवी यांचे तज्ज्ञ मत मिळविले. त्यांच्या मतानुसार प्रति वार्षिक दंड हा पैशाचा हुकूमनामा काढताना न्यायालय करीत असल्यानुसार हुकूमनाम्याच्या रकमेवरील व्याजाप्रमाणे असतो.

सदर कायदेविषयक मताच्या आधारे, सह आयुक्त (सुधार) / अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) यांनी वर निर्देशित क्रमांकानुसार खालील बाबींस मान्यता दिली आहे.

1) ज्या महिन्यात दंड आदेशिका बजावण्यात /आकारण्यात आली तेव्हापासून ज्या महिन्यात देयकातील कराची सर्व रक्कम वसूल करण्यात आली तो महिना (दोन्ही महिने समाविष्ट करुन) विचारात घेऊन थकित मालमत्ताकरावर दंडाचे परिगणन करणे व दंडाची वसुली करणे.
2) थकित राहिलेली दंडाची अत्यधिक रक्कम माफ / रद्द किंवा सुधारित करणे.

तदनुसार, सर्व विभागाच्या सहायक करनिर्धारक व संकलक यांस याद्वारे असे निदेश देण्यात येत आहे की, त्यांनी दि.01.04.2002 ते दि.31.03.2009 पर्यंतच्या कालावधीमध्ये दंड आकारणी केलेल्या प्रकरणी दंड माफीचे प्रस्ताव सादर करावेत.(अशा प्रकरणाकरिता छाननी प्रपत्र सोबत जोडण्यात आलेले आहे.)

ज्या प्रकरणांत दि.01.04.2002 पूर्वी दंड आकारणी करण्यात आलेली आहे. त्या प्रकरणाकरिता दि.31.12.2002चे परिपत्रक क्र.एसी/44/जनरल वैध व परिणामकारक राहील.

पुढे असे कळविण्यात येते की, दि.01.04.2009 पासून पुढे दंडाची रक्कम दंड आदेशिकेवर तसेच थकबाकीचा तपशील दर्शविणाऱ्या पडद्यावर दिसणार नाही. तथापि दंडाचे परिगणन व वसुली मासिक तत्वावर

संगणक प्रणालीद्वारे करण्यात येईल.  वरील बाबी विचारात घेता अशाप्रकारे वसूल करण्यात आलेल्या दंडाच्या माफीकरिता विनंती करणारे अर्ज फक्त खालील प्रकरणी विचारात घेतले जातील.

1) जेथे दंडाची आकारणी प्रारंभापासूनच चुकीची / दोषपूर्ण असेल,

2) जेथे महानगरपालिका आयुक्त, वसूल केलेल्या दंडाची रक्कम पूर्णतः किंवा अंशतः माफ करण्याकरिता, प्रकरण योग्य समजतील.

यास्तव,सर्व विभागाच्या सहायक करनिर्धारक व संकलक यांना याद्वारे असे निदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी सर्व प्रलंबित प्रकरणी कार्यवाही करावी आणि ही सर्व प्रकरणे चालू  आर्थिक वर्ष अखेरीपर्यंत निकाली निघण्याची दक्षता घ्यावी.  वरील आदेशाची परिणामकारक अंमलबजावणी केली जाईल याची विभागीय उप करनिर्धारक व संकलक यांनी खातरजमा करावी.

**( एन.ए.पठाण )**
**15.09.2009**
**करनिर्धारक व संकलक**

**सहा.क.व सं. /**

# बृहन्मुंबई   महानगरपालिका

## दंड माफीच्या प्रकरणांकरिता छाननी प्रपत्र

| | | |
|---|---|---|
| 1 | दंडमाफ करण्याकरिता विनंती करणारे पत्र | (पृष्ठ क्र.        ) |
| 2 | प्रपत्र एक चा उतारा | (पृष्ठ क्र.        ) |
| 3 | पक्षकाराच्या पत्रावरील अधीक्षकाचे अभिप्राय व प्रपत्र-260 सह अधीक्षकाच्या खालील बाबींविषयी अहवाल<br>एक) दंड आदेशिका बजावण्याबाबत<br>दोन) अधिदानाचा तपशील सोबतच्या तक्त्यामध्ये आहे | (पृष्ठ क्र.        )<br>(पृष्ठ क्र.        )<br>(पृष्ठ क्र.        ) |
| 4 | वरील अनु.क्र.3 (दोन) नुसार अधीक्षकाने दिलेल्या अधिदानाच्या तपशिलाची करनिर्धारण व देयके उप विभागाकडून स्थायीकरण. | (पृष्ठ क्र.        ) |
| 5 | वसुलीयोग्य दंड व माफ करावयाचा / प्रतिदान करावयाचा / सुधारित करावयाचा अधिक दंड यांचे परिगणन दर्शविणारा तक्ता. | (पृष्ठ क्र.        ) |

**सहा.करनिर्धारक व संकलक / ______________ विभाग**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**परिपत्रक क्र.एसी/144/जनरल/2009-10**

**दिनांक 29.09.2009**

विषय:प्रति वार्षिक तत्वावर दंडाची वसुली व आकारलेल्या दंडाची माफी.

दिनांक 15.09.2009 च्या परिपत्रक क्र.एसी/22/जनरलचे हे पूरकपत्र आहे.

थकित महानगरपालिका करांवर दिनांक 01.04.2002 पासून 20 टक्के प्रतिवर्ष दराने आकारण्यात आलेला दंड,वर संदर्भित केलेल्या दिनांक 15.09.2009च्या परिपत्रक क्र.एसी/22/जनरल मध्ये निदेशित केल्यानुसार,विलंबित अधिदान (महिन्यांच्या संख्येचा कालावधी) विचारात घेऊन, वसूल केला जाईल.

तथापि, महाराष्ट्र राज्य शिक्षण व रोजगार हमी उपकर नियम, 1962 मधील कलम 10(1)च्या तरतुदीमध्ये तदनुसार अद्याप सुधारणा करण्यात न आल्यामुळे थकित शासकीय करावरील दंड प्रतिवर्ष तत्वावर आकारण्यात येत नाही. यास्तव दिनांक 01.04.2002 ते दि.31.03.2009 या कालावधीत दंड आकारणी करण्यात आली आहे अशा प्रकरणी शासकीय करावरील पूर्ण (100 टक्के) दंड वसूल करण्यात यावा आणि ज्या प्रकरणात आकारण्यात आलेला दंड आरंभापासूनच चुकीचा /दोषपूर्ण आहे अशी प्रकरणे वगळता अन्य प्रकरणात शासकीय करांवरील दंड माफ करण्याचे प्रस्ताविण्यात येऊ नये असे निदेश देण्यात येत आहेत.

विभागाचे सहा.करनिर्धारक व संकलक /अधीक्षक यांनी या सूचनांचे काटेकोरपणे अनुपालन करावे असे निदेश देण्यात येत आहेत.

**(एन.ए.पठाण )**
**25.09.2009**
**करनिर्धारक व संकलक**

**उप क.व सं./ .**
**सहा.क.व सं. / .**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**दंड माफीच्या प्रस्तावाबाबत परिगणनाचा तपशील भरावयाकरिता प्रपत्र**

| अनु क्र. | विभाग क्र. | सॅक क्र. | देयकाचा कालावधी | ज्यावर दंड आकारण्यात आला ती देयकाची रक्कम | | | दंड आकारणीच दिनांक | संगणक प्रणालीत दिसणारी दंडाची रक्कम | अधिदानाचा तपशील | | | भरलेली दंडाची रक्कम | अधिदानाचा दिनांक | अभिप्राय असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | म.न.पा. कर | शासकीय कर | एकूण कर | | | भरलेला म.न.पा. कर | भरलेला शासकीय कर | एकूण भरलेली रक्कम | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

**अधीक्षक विभाग / सहा.क.व सं. विभाग**